विषय :- प्रकल्पांमुळे पुनर्वसित झालेल्या ३५० ते १००० लोकसंख्या असलेल्या वसाहतीत ग्रामपंचायती स्थापन करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास व जलसंधारण विभाग
### शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२०११/ प्र.क्र.१९१/पंरा-४
मंत्रालय, मुंबई

तारीख: ४ मार्च,२०१४

वाचा

१) शासन निर्णय क्रमांकः ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६०३ / प्र.क्र.१५४४ / पंरा-४ (२२) दिनांक १२ फेब्रुवारी,२००४

प्रस्तावना

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ४ अन्वये ग्रामपंचायतीचे विभाजन / एकत्रीकरण किंवा त्रिशंकू भागासाठी स्वतंत्र ग्रामपंचायतीची स्थापना करण्यासंदर्भात शासनाने दिनांक १२/२/२००४ रोजी सर्वसमावेशक सूचनांचा अंतर्भाव करुन संदर्भीय शासन निर्णय पारीत केला आहे. सन १९९६ मध्ये शासनाने नेमलेल्या गगराणी समितीने ग्रामपंचायत स्थापनेबाबतच्या निकषात बदल करण्याबाबत केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद शासन निर्णयात ज्या महसुली गावी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची असेल त्या गावाची लोकसंख्या कमीत कमी २००० असणे आवश्यक आहे. केवळ अपवादात्मक प्रकरणात (उदा. आदिवासी व तांडा या भागांसाठी किंवा दोन गावांत जर ३ कि.मी. पेक्षा जास्त अंतर असेल) तर त्या भागाकरीता किमान लोकसंख्या १००० असणे आवश्यक केले आहे. पाटबंधारे प्रकल्पामुळे पुनर्वसित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या वसाहती या प्रामुख्याने दुर्गम व डोंगराळ भागामध्ये असल्याने उपरोक्त नमुद लोकसंख्येच्या अटीमुळे शेजारच्या ग्रामपंचायतींपासून दूर असून देखील या वसाहतींमध्ये ग्रामपंचायती स्थापन होवू शकल्या नाहीत. त्यामुळे प्रकल्पग्रस्त वसाहतींना बऱ्याच मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागले आहे.

पाटबंधारे प्रकल्पासहीत अन्य शासनाच्या विविध प्रकल्पांमुळे पुनर्वसित झालेल्या वसाहतींना लोकसंख्येच्या अटीमुळे तेथे स्वतंत्र ग्रामपंचायती स्थापन होऊ न शकल्यामुळे मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याने अशा पुनर्वसित वसाहतींमधील महसूली गांव जाहीर झालेल्या आणि किमान ३५० ते १००० लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये ग्रामपंचायती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

रोटा/एच-२६८०[१०००-४-२०१४]-१

## शासन निर्णय

राज्यातील विविध प्रकल्पांमुळे पुनर्वसित झालेल्या आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ४ (१) नुसार स्वतंत्र महसूली गांव म्हणून जाहीर केलेल्या वसाहती / गावांना लोकसंख्येची अट शिथील करुन यापुढे किमान ३५० ते १००० लोकसंख्या असलेल्या पुनर्वसित महसूली गावांत ग्रामपंचायतीं स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. अशा गावात रीतसर गावठाण घोषीत करण्याची कार्यवाही करण्यात यावी. उर्वरीत निकष शासन निर्णय क्र. व्हीपीएम २६०३ / प्र.क्र.१५४४ / पंरा-४ (२२) दिनांक १२ फेब्रुवारी,२००४ प्रमाणे कायम राहतील.

अशा पुनर्वसित झालेल्या गावाच्या ग्रामपंचायतींना, ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम संबंधित प्रकल्प यंत्रणेकडूनच नागरी सुविधेअंतर्गत करून देण्यात येईल. तसेच या गावाच्या ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकाचा पदभार सद्यस्थितीत लगतच्या ग्रामपंचायतीकडील ग्रामसेवकाकडे देण्यात यावा.

ज्यांची लोकसंख्या किमान ३५० आहे अशा ग्रामपंचायतींना शासन आकृतीबंधानूसार कर्मचारी वर्ग उपलबध करून देण्यास व शासनाच्या धोरणाप्रमाणे वार्षिक सहायक अनुदान देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच संबंधीत ग्रामपंचायतींच्या सरपंचाना मानधन व ग्रामपंचायत सदस्यांना बैठक भत्ता दिनांक २७ जुलै,२००९ च्या शासन निर्णयानुसार देय राहील.

उपरोक्त शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १२६ /२०१ / व्यय -१५ दिनांक २२/२/२०१४ या विभागास मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०३०११११३१८९१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Santokh Singh Sandhu

Digitally signed by Santokh Singh Sandhu
DN: CN = Santokh Singh Sandhu, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Rural Development Department
Reason: I am approving this document
Date: 2014.03.05 09:58:45 +05'30'

(एस.एस.संधू)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. माननीय राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री व मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव



Scanned by CamScanner

Scanned with CamScanner